N.C.R.B (एन.सी.आर.बी)

I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**

प्रथम खबर अहवाल

(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

**District (जिल्हा):** औरंगाबाद शहर **P.S.(ठाणे):** क्रांति चौक **Year (वर्ष):** 2020

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0060 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 27/02/2020 04:40 बजे

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

**(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** बुधवार

**Date From (दिनांक पासून):** 26/02/2020

**Time Period (कालावधी):** पहर 7

**Date To ( दिनांक पर्यंत):** 26/02/2020

**Time From (वेळेपासून):** 20:40 बजे

**Time To (वेळेपर्यंत):** 20:50 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 27/02/2020 **Time (वेळ):** 04:00 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 010 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 27/02/2020 04:23 बजे

**Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

**Place of Occurrence (घटनास्थळ):**

1. **(a) Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** उत्तर

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** पोलीस ठाणे क्रांती चौक ,औरंगाबाद

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

**Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** अनिल राधाकिसन माळी

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 2000 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**

**ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | सातेफळ ता जाफ्राबाद,जालना,क्रांति चौक,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | सातेफळ ता जाफ्राबाद,जालना,क्रांति चौक,औरंगाबाद शहर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.): 91-9763255795**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अ आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमा |
|---|---|---|---|---|
| 1 | रमेशलाल रामलाल जैस्वाल | | | 1. प्लट नं 36,जटवाडा रोड, कलनी,औरंगाबाद,क्रांति चौक, शहर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | गोपाल सोनवणे | | | 1. पोहेक/2035,पोलीस ठाणे औरंगाबाद शहर,क्रांति चौक, शहर,महाराष्ट्र,भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रा करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

**10 Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

**11 Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12 First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद जालना दिनांक 27.02.2020 मी अनिल राधाकिसन माळी, वय 20 वर्ष, व्यवसाय शेती रा. सातेफळ, ता. जाफ्रबाद, जि.जालना. मो नं. 9763255795. समक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना कार्यालयात हजर येऊन तक्रार देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन शेती काम करतो. सदर ठिकाणी मी व माझी आई नामे सौ सविता, वडील राधाकिसन माळी व आजी आजोबा असे राहण्यास आहे.माझी आई नामे सौ. सविता राधाकिसन माळी, वय 35 वर्षे हिस क्रांती चौक पोलीस ठाणे औरंगाबाद येथी गुन्हा रजिस्टर नं. 44/2020 भादवि कलम 420,406,467,468,34 हया गुन्हयामध्ये दि. 23.02.2020 रोजी क्रांती चौक पोलीस ठा औरंगाबाद येथील पोलीस हवालदार रमेशलाल जैस्वाल व पोलीस हवालदार गोपाल सोनवणे यांनी अटक केली होती. त्यानंतर आईस कोर्टात हजर केल्यावर दि. 27.02.2020 रोजी पर्यत पी सी आर मध्ये क्रांती चौक पोलीस ठाणे येथील लकअफमध्ये ठेवण्यात आले आहे. त्यानं दि. 25.02.2020 रोजी मला पोलीस हवालदार रमेशलाल जैस्वाल व पोलीस हवालदार गोपाल सोनवणे यांनी क्रांती चौक पोलीस ठाणे येथे बोलावुन सागिंतले कि, तु आम्हाला 10 - 15 हजार रुपये आणुन दे नाहीतर सिमा रेसवाल हिस जशी जामिन होऊन दिली नाही तशी तुझ्या आईची जामिन होऊ देणार नाही तसेच महाराष्ट्रातील नगर, जालना जिल्हयात ज्या ज्या ठिकाणी असे गुन्हे दाखल आहेत त्यागुन्हयात आरोपी करेन असे म्हणाले, त्यावेळी मी त्यांना म्हणालो कि, माझ्याकडे ऐवढे पैसे नाहीत. मी मजुरी करुन जगतो तरीही काही पैसे मिळाल्यास तुम्हाला आणुन देतो. असे म्हणाल्यावर त्यांनी मला क्रांती चौक पोलीस ठाणे येथील रुममध्ये नेऊन माझ्या आईशी बोलणे करुन दिले व आईला सुध्दा म्हणाले कि, तुझ्या मुलाला 15000रु आणुन देण्यास सांग नाहीतर तुझी जामीन होऊन देणार नाही तसेच महाराष्ट्रातील नगर, जालना जिल्हयात ज्या ज्या ठिकाणी असे गुन्हे दाखल आहेत त्या गुन्हयात आरोपी करेन असे मला व आईस म्हणाले. त्यावेळी माझी आई मला म्हणाल कि, तु पैशाची व्यवस्था कर व माझी जामिन करुन मला जेलमधुन बाहेर काढ. त्यानंतर मी सदर ठिकाणावरुन निघुन आलो. त्यानंतर पोलीस हवालदार रमेशलाल जैस्वाल व पोलीस हवालदार गोपाल सोनवणे यांनी मला माझ्या वरील नंबरवर वारंवार फोन करुन तु लवकर पैसे आणुन दे म्हणजे तुझ्या आईची जामिन लवकर करता येईल व दुस-या जिल्हयातील गुन्हयात आरोपी करणार नाही. असे सांगत होते. तसेच त्यांच्या मोबाईल नंबरवरुन माझ्या मोबईलवर फोन करुन माझ्या आईस ही बोलण्यासाठी देत होते व तिला सुध्दा मी पैसे आणुन दयावेत यासाठी सांग होते. माझी पोलीस हवालदार रमेशलाल जैस्वाल व पोलीस हवालदार गोपाल सोनवणे यांना लाच द्यायची इच्छा नाही परंतु लाच दिली न



Scanned with CamScanner

तर ते माझ्या आईची जमानत करुन देणार नाहीत व महाराष्ट्रात नगर व जालना येथे याप्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयामध्ये आरोपी करतील. पोलीस हवालदार रमेशलाल जैस्वाल व पोलीस हवालदार गोपाल सोनवणे यांचेशी माझी वैयक्तीक दुश्मणी नाही, अगर देण्याघेण्याचा अथवा उसनवारीचा आर्थीक व्यवहार नाही. तसेच पोलीस हवालदार रमेशलाल जैस्वाल व पोलीस हवालदार गोपाल सोनवणे यांनी मागणी केलेले 15,000/- रुपये मी सोबत आणले आहेत. पोलीस हवालदार रमेशलाल जैस्वाल व पोलीस हवालदार गोपाल सोनवणे हे माझ्याकडे मागत असलेले पैसे लाचेचे असल्याचे मला माहित आहे. मी दिनांक 26.02.2020 रोजी पोलीस हवालदार रमेशलाल जैस्वाल व पोलीस हवालदार गोपाल सोनवणे यांना भेटण्यासाठी क्रांती चौक पोलीस ठाणे औरंगाबाद येथे जाणार असुन त्यावेळी मी त्यांना माझ्या आईची लवकरात लवकर जामिन करण्यासाठी व महाराष्ट्रात नगर व जालना येथे याप्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयात आरोपी न करण्याबाबत विनंती करणार आहे. त्यावेळी पोलीस हवालदार रमेशलाल जैस्वाल व पोलीस हवालदार गोपाल सोनवणे यांनी मला लाचेची मागणी करुन ते स्वत: किंवा इतरा मार्फत स्विकारल्यास त्यांना पकडून कार्यवाही करावी. अशी तक्रार दिली.माझ्या तक्रारी वरुन लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालनाचे पोलीस निरीक्षक श्री.एस.एस.ताटे साहेब यांनी, मी पोलीस हवालदार रमेशलाल जैस्वाल व पोलीस हवालदार गोपाल सोनवणे, क्रांती चौक पोलीस ठाणे औरंगाबाद यांचे विरुध्द केलेली तक्रार खरी आहे काय क्रांतीचौक पोलीस स्टेशनचे पोलीस हवालदार श्री.जैस्वाल व सोनवणे हे माझ्याकडे लाच मागतात काय याची खात्री करण्याकरीता, लाचेच्या मागणीची पडताळणी करण्यासाठी सरकारी वाहनाने जालना येथुन सोबतच्या कर्मचाऱ्यांसह औरंगाबाद येथे गेलो. तेथे सुरक्षीत ठिकाणी- P.T.O. -मला व पंचाना पोलीस निरिक्षक श्री.ताटे यांनी आवश्यक त्यासुचना दिल्या त्यानंतर मला, पंच क्रं. 1 श्री. वाकोडे यांचेसह क्रांतीचौक पोलीस स्टेशन औरंगाबाद येथे पोलीस हवालदार रमेशलाल जैस्वाल व पोलीस हवालदार गोपाल सोनवणे यांना भेटण्यासाठी दि.26.02.2020 रोजी क्रांतीचौक पोलीस स्टेशन,औरंगाबाद येथे पाठविण्यात आले. त्यावेळी माझ्याकडे व्हाईस रेकर्डर मशीन सुरु करुन देण्यात आले होते. त्यावेळी मी भेटीमध्ये त्यांना माझ्या आईची गुन्हयातुन लवकरात लवकर जामिन करण्यासाठी व महाराष्ट्रातील नगर व जालना येथे याप्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयात आरोपी न करण्याबाबत बोलणी केली असता पोलीस हवालदार श्री. रमेशलाल जैस्वाल व श्री. गोपाल सोनवणे यांनी माझ्याकडे पंचा समोर 15,000/- रु.( पंधरा हजार) रुपयाची मागणी करुन स्विकारण्यास तयार झाले. व लाचेची रककम क्रांतीचौक पोलीस स्टेशन येथे आणुन देण्यास सागिंतले. त्याबाबतचा सविस्तर पंचनामा करण्यात आला आहे. त्यानंतर दि.26.02.2020 रोजी पोलीस हवालदार श्री.रमेशलाल जैस्वाल व श्री. गोपाल सोनवणे यांचे विरुध्द सापळा लावण्याचे ठरविण्यात आले. त्यानुसार औरंगाबाद येथील छावणी परिसरात औरंगाबाद ते अहमदनगर रोडचे बाजुस सुरक्षित स्थळी मला व पंचांना अंथ्रासीन पावडरची माहीती देवुन त्याचे प्रात्यक्षीत दाखविण्यात आले. पोलीस हवालदार श्री.रमेशलाल जैस्वाल व पोलीस हवालदार श्री. गोपाल सोनवणे यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्याकडे असलेल्या 15,000/-रुपयांना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी यांनी लाचेच्या रकमेस अंथ्रासीन पावडर लावली व पोलीस हवालदार श्री.रमेशलाल जैस्वाल व श्री. गोपाल सोनवणे यांना देण्यासाठी पावडर लावलेले पैसे माझ्या पन्टचे उजव्या खिशात ठेवले. परत पोलीस निरिक्षक श्री.ताटे साहेब यांनी मला व पंचाना आवश्यक त्या सुचना दिल्या. त्यानंतर मला व पंच श्री.वाकोडे यांना शासकीय वाहनामध्ये औरंगाबाद येथील क्रांतीचौक परिसरातील पोलीस कलनी समोर सोडले तेथुन मी व पंच श्री.वाकोडे असे पायी चालत क्रांतीचौक पोलीस स्टेशन येथे गेलो. त्याठिकाणी पोलीस निरीक्षक श्री.ताटे व त्यांचे सोबतचा स्टफ तसेच पंच नं.2 श्री.गायके असे आले. त्यानंतर 18.10 वा. सापळा लावण्यात आला. सापळयाचे वेळी पोलीस हवालदार श्री.सोनवणे हे तेथे हजर नव्हते तेथे पोलीस हवालदार श्री. जैस्वाल हे हजर असल्याने त्यांना भेटलो त्यावेळी त्यांनी माझ्या आईची गुन्हयातुन लवकरात लवकर जामिन करण्यासाठी व महाराष्ट्रातील नगर व जालना येथे याप्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयात आरोपी न करण्यासाठी माझ्या कडुन मोबदला म्हणुन 15,000/- रुपयाची लाच पंच श्री. वाकोडे यांचे समक्ष 20.40 वाजे दरम्यान स्विकारली. त्यानंतर मी सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा केला. पोलीस निरीक्षक श्री.ताटे व स्टफ तसेच पंच नं.2 श्री.गायके असे लगेच त्याठिकाणी आले व माहीती विचारुन पोलीस हवालदार श्री.रमेशलाल जैस्वाल यांना पकडले. माझ्या कडील व्हाईस रेकर्डर बंद केला. पो.नि.श्री ताटे यांनी पोलीस हवालदार श्री.जैस्वाल साहेब यांना आपली व सोबतच्या कर्मचारी यांची ओळख करुन दिली. पोलीस हवालदार श्री.जैस्वाल यांना त्यांचे नाव गाव विचारले असता त्यांनी त्यांचे पुर्ण नाव श्री.रमेशलाल रामलाल जैस्वाल वय 50 वर्षे, पो.हे.क्र.393, नेमणुक पोलीस ठाणे क्रांतीचौक, औरंगाबाद शहर, जि.औरंगाबाद रा.प्लट नं.36, सईदा कलनी, जटवाडारोड, औरंगाबाद ता.जि.औरंगाबाद असे सागीतले. त्याठिकाणी माझे हात तपासण्यात आले. त्यानंतर आम्ही सर्वजण लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जालना येथे आलो. सर्व घटने बाबत सविस्तर पंचनामे करण्यात आले. म्हणुन . पोलीस हवालदार श्री.रमेशलाल जैस्वाल व पोलीस हवालदार श्री. गोपाल सोनवणे यांदोघांनी माझ्या आईची गुन्हयातुन लवकरात लवकर जामिन करण्यासाठी व महाराष्ट्रातील नगर व जालना येथे याप्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयात आरोपी न करण्यासाठी लाचेची मागणी करुन, पोलीस हवालदार श्री.रमेशलाल रामलाल जैस्वाल यांनी अंन्थ्रासिन पावडर लावलेली लाचेची रक्कम 15,000/-रुपये पंचासमक्ष स्विकारली म्हणुन त्या दोघाविरुध्द कायदेशीर कार्यवाही करुन गुन्हा दाखल करावा म्हणुन माझी फिर्याद आहे.माझी वरील फिर्याद माझे सं◌ागणेप्रमाणे संगणकावर टंकलिखीत केली असुन मी वाचुन पाहिली ती बरोबर व खरी आहे. अनिल राधाकिसन माळी सदर गुन्हंयाचा तपास श्री. एस. एस. ताटे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि, जालना मो.नं. 8390757835 यांचेकडे दिला.

**Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

1) **Registered the case and took up the Investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** UTTAM DADARAO MULAK(I (Inspector)) / POBN55887 **or (किंवा)**

2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**



Scanned with CamScanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a c given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, क नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

आनिल माळी

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

डि. ओ. अधिकारी
पोलीस ठाणे क्रान्ती चौक
औरंगाबाद (श

**Signature of Officer in charge, Station** (ठाणे प्रभारी अधिका-

**Name (नाव):** UTTAM DADARAO MU
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN55887

Scanned with CamScanner